प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

नोव्हेंबर 29, 2018

**पूर्वांचल को-ऑपरेटिव बँक लि., गाझीपूर, उत्तर प्रदेश ह्यांचेवर आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित कलम 47अ (1)(क) खाली देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने पूर्वांचल को-ऑपरेटिव बँक लि., गाझीपूर, उत्तर प्रदेश, ह्यांचेवर रु.5.00 लाख (रुपये पाच लाख) दंड लागु केला असून, तो दंड, गृहनिर्माण योजनांसाठीचे वित्तसहाय्य-युसीबीज, ह्यावर आरबीआयने दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे ह्यांचे उल्लंघन, संचालक/त्यांचे नातेवाईक / त्यांचे हितसंबंध असलेल्या संस्था ह्यांना कर्जे व अग्रिम राशी देणे, असुरक्षित अग्रिमांवर जास्तीत जास्त मर्यादा ओलांडणे, उत्पन्न ओळख, ॲसेट वर्गीकरण, तरतुदीकरण व इतर संबंधित बाबी-युसीबीज ह्यावर कर्ज देण्याच्या व्यवहारांसाठीच्या वैय्यक्तिक /एकल एक्सपोझ्र मर्यादेचे उल्लंघन करणे ह्यासाठी लागु करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने, वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर त्या बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य बँकेने दिलेले उत्तर व वैय्यक्तिक सुनावणी विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1240**